INTERNATIONAL WEBINARACTIVITY SUPPORTING DOCUMENTS






- **Registration Link :**
  https://forms.gle/1nyRSQHPxknHvH1N8

- **Telegram Link :**
  https://t.me/joinchat/FpXauUQ4vmnZPuj4

- **Email ID :**
  hindiinternationalwebinar2021@gmail.com




## बीड

# भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ

### डॉ. शिवकुमार सिंह : जनविकास महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय वेबिनार

**केज ता.२० (बातमीदार): बनसारोळा येथील जनविकास महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय (अंबाजोगाई) यांच्या संयुक्त विद्यमाने "वैश्विक परिदृश्य में भारतीय भाषा संस्कृती साहित्य की पारस्पारिकता" या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनार मंगळवारी (ता.१९) पार पडला.**

जनविकास महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय वेबिनार प्राचार्या डॉ. वनमाला गुंडरे (रेड्डी) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. वेबिनारची सुरुवात डॉ. सुशीला व्यास यांच्या स्वागत गीताने झाली. वेबिनारमध्ये प्राचार्य डॉ. बाबासाहेब गोरे, डॉ.आलोक पांडे, डॉ. शिवकुमार सिंह, डॉ. रिद्धिमा निशादिनी लंस्कार व अखिलेंद्र मिश्र यांनी सहभाग घेतला होता.

प्रास्ताविक डॉ. मुरलीधर लहाडे यांनी केले. वेबिनारमध्ये प्राचार्य डॉ. गोरे यांनी भारतीय संस्कृती व समाज जगात कसा श्रेष्ठ असून भारतीय संस्कृतीचा उपयोग इतर देशात कशा पद्धतीने केला जातो या संबंधी माहिती दिली. बीज भाषक म्हणून विश्व हिंदी संघटन संस्थेचे अध्यक्ष व दिल्ली विद्यापीठाचे डॉ. पांडे यांनी रामायण-महाभारताची उदाहरणे दाखले देत भारतीय संस्कृती जगात कशी श्रेष्ठ आहे हे त्यांनी पटवून दिले. पोर्तुगाल येथील डॉ. शिवकुमार सिंह यांनी वैश्विक परिदृश्य भारतीय, भाषा संस्कृती आणि साहित्य यांचा संबंध पोर्तुगाल भाषामध्ये कशा प्रकारे केला जातो याविषयी मार्गदर्शन केले. विश्वहिंदी संघटन या संस्थेचे उद्देश वाचन डॉ. कोयल विश्वास माऊंट कॉलेज बेंगलोर यांनी केले तर श्रीलंका येथील कोलंबो विद्यापीठाच्या डॉ. रिद्धिमा लंस्कार यांनी हिंदी भाषा व सिंहली भाषांमध्ये कसे साम्य आहे हे सांगून हिंदी भाषा श्रीलंकेत कशी वापरली जाते याची माहिती दिली. आंतरराष्ट्रीय वेबिनारचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून अखिलेंद्र मिश्र यांनी भारतीय संस्कृती कशी श्रेष्ठ आहे, याविषयी आपले विचार मांडले. वेबिनारचे तांत्रिक सहाय्यक म्हणून प्रा. अली यांनी काम पाहिले तर सहभागी झालेल्या मान्यवरांचा परिचय प्रा. अरविंद घोडके यांनी दिला. सूत्रसंचालन उपप्राचार्य रमेश शिंदे यांनी केले तर डॉ. गोपाळ भोसले यांनी आभार मानले.

